**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक १५ मे २०२५**

**ठळक बातम्या**

1. ऑपरेशन सिंदूर म्हणजे दहशताविरोधातलं सगळ्यात मोठं पाऊल असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचे प्रतिपादन.
2. महानगरपालिका निवडणुका लवकर घेण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न असून, या निवडणुका महायुती एकत्रच लढणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन.
3. नागपूर जिल्हास्तरीय तिरंगा यात्राचे आयोजन उद्या कामठीतुन होणार.
4. उद्या आणि परवा विदर्भातल्या बहुतांश जिल्ह्यात वादळी पर्जन्यमान कायम राहणार.

---------------------------------------

**राजनाथ सिंह**

ऑपरेशन सिंदूर म्हणजे दहशताविरोधातलं सगळ्यात मोठं पाऊल असल्याचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. भारत पाकिस्तान यांच्यातील संघर्ष आणि दहशतवादी कारवायांच्या पार्श्वभुमीवर राजनाथसिंह आज सकाळी जम्मू आणि काश्मीर दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांनी श्रीनगरमधील बदामीबाग इथल्या सैनिकांना संबोधित केलं.

*(होल्ड बाईट - राजनाथ सिंग- 27 सेकंद)*

*हमारे प्रधानमंत्री माननीय नरेंद्र मोदी जी के कुशल नेतृत्व और मार्गदर्शन में ऑपरेशन सिंदूर के दौरान आपने जो कुछ भी किया है, उस पर पूरे देश को गर्व की अनुभूति हो रही है। मैं अभी भले ही आपका रक्षा मंत्री हूँ, लेकिन उससे पहले तो मैं भारत का एक नागरिक हूँ, रक्षा मंत्री के साथ साथ मैं आज भारत के नागरिक के रूप में भी आप सब के प्रति आभार व्यक्त करने के लिए यहाँ मौजूद हूँ।*

ते पुढं म्हणाले कि पाकिस्ताननं भारताच्या शिरावर वार केला, प्रत्युत्तरादाखल आपण त्यांच्या छातीवर वार केला, पाकिस्तान आजही भारताला धोका देत असल्याचंही ते म्हणाले. ऑपरेशन सिंदूर दरम्यान सैनिकांच्या शौर्य आणि संयमाला संपूर्ण देश सलाम करतो, देशाला सैनिकांचा अभिमान आहे, असं सांगून

हुतात्मा झालेल्या सैनिकांना त्यांनी श्रध्दांजली वाहिली. ऑपरेशन सिंदूरनंतर संरक्षण मंत्री प्रथमच जम्मू काश्मीर दौऱ्यावर आहेत. या भेटीत ते बैठक घेऊन जम्मू काश्मीरच्या सुरक्षेचा आढावाही घेणार आहेत.

---------------------------------------

वक्फ

वक्फ सुधारणा कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्यायाचिकांवर २० मे रोजी सुनावणी होईल असं सर्वोच्च न्यायालयानं आज सांगितलं. याचिकाकार्त्यांचे वकील कपिल सिब्बल आणि सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी त्यांचं निवेदन १९ मे रोजी न्यायालयासमोर सादर करावं असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या पीठानं सांगितलं. १९९५च्या वक्फ कायद्यातल्या तरतुदींना स्थगिती देण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर कोणताही विचार केला जाणार नाही, असं न्यायालयानं स्पष्ट केलं.

---------------------------------------

महानगरपालिका निवडणुका

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यात महानगरपालिका निवडणुका वेळेवर घेण्याचा राज्यशासनाचा प्रयत्न असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात प्रसारमाध्यम प्रतिनिधीना सांगितलं. या निवडणुका महायुती एकत्रच लढवणार असून कार्यकर्त्यांच्या मागणीनुसार अपवादात्मक ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होतील असं ते म्हणाले.

*(होल्ड बाईट- मुख्यमंत्री १९ सेकंद)*

*आम्हाला या निवडणुका महायुती म्हणूनच लढायचे आहे. आम्ही तिघेजण एकत्रित आहोत. आमची महायुती आहे. एखाद्या ठिकाणी अपवादात्मक परिस्थितीत वेगळं लढावं लागलं तरीही एकमेकांवर टीका न करता पॉझिटिव्ह प्रचार आम्ही करू. पण शक्यतोवर जेवढ्या जास्तीत जास्त ठिकाणी ज्या ज्या ठिकाणी महायुती करता येईल त्या त्या ठिकाणी महायुतीच करू.*

मराठा आरक्षणाच्या संदर्भात राज्यसरकार लौकरच आपली भूमिका न्यायालयात मांडेल असं त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं.प्रशासकीय सुधारणा आणि कार्यक्षमता वाढीच्या उद्देशाने राज्यशासन प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या कार्यशाळा आयोजित करत आहे. त्यादृष्टीनं दीडशे दिवसांचा कार्यक्रम अधिकाऱ्यांना देण्यात आला आहे, अशी माहिती फडणवीस यांनी दिली. महानगरपालिका अधिकाऱ्यांसाठीच्या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यासाठी मुख्यमंत्री पुण्यात

होते. पाकिस्तानला पाठिंबा देणाऱ्या तुर्किच्या मालावर बहिष्कार टाकण्याच्या पुण्यातल्या व्यापाऱ्यांचं त्यांनी अभिनंदन केलं.

---------------------------------------

संकेतस्थळ

महाराष्ट्र सरकारची अधिकृत संकेतस्थळ www.maharashtra.gov.in आणि सरकारी निर्णय-जीआर पोर्टल www.gr.maharashtra.gov.in नियमित देखभाल आणि तांत्रिक अद्यावतीकरणामुळे ,आज आणि उद्या दोन दिवस बंद राहील. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळानं ही माहिती जारी केली आहे. या कालावधीत अधिकृत सरकारी पोर्टलवर कोणत्याही सेवा उपलब्ध नसतील. राज्यातील नागरिक, सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ही वेळ पाळण्यास सांगण्यात आलं आहे.

---------------------------------------

तिरंगा यात्रा

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत आपल्या सशस्त्र दलांनी पाकिस्तानातील दहशतवादी अड्डे नष्ट केले. तसेच पाकिस्तानच्या संरक्षण दृष्ट्या अत्यंत महत्वाच्या ठिकाणांचेही या हल्ल्यात मोठे नुकसान झाले. भारतीय संरक्षण दलाच्या या गौरवपूर्व कामगिरीच्या सन्मानार्थ आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी च्या कणखर नेतृत्वाच्या सन्मानार्थ पक्षातर्फे देशभर आगामी काळात भव्य तिरंगा यात्रा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नागपूर जिल्हा स्तरीय तिरंगा यात्रेचे आयोजन, उद्या 16 रोजी सकाळी 8 वाजता कामठी शहर इथल्या, जयस्तंभ चौक ते मोटर स्टॅण्ड ते नेताजी चौक कामठी पर्यंत तिरंगा यात्रा प्रदेशअध्यक्ष तथा राज्याचे महसुलमंत्री आणि नागपुर जिल्हा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले आहे. जिल्हा स्तरीय यात्रेत कमीत कमी 5000 लोक सहभागी होण्याचा अंदाज आहे. यात माजी सैनिक, माजी सेवानिवृत्त व अन्य राष्ट्रभक्त मान्यवर व जनसामान्य नागरीकांचा समावेश असणार आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना अर्पीत करुन या यात्रेचा प्रारंभ होईल.

---------------------------------------

स्मार्ट बस

भविष्यात एसटीच्या प्रवाशांना सुरक्षित प्रवासा बरोबरच वक्तशीर बस सेवा देण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज असलेल्या एसटीच्या "स्मार्ट बसेस" घेण्यात येणार आहेत. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एस.टी.महामंडळाचे

अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. नव्या ३ हजार बसेस खरेदी च्या अनुषंगाने बोलावलेल्या बस बांधणी कंपन्यांच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला एस.टी.महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर व संबंधित खाते प्रमुखांसह बस बांधणी कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

---------------------------------------

घरकुल

शासनाने जाहीर केल्यानुसार घरकुल लाभार्थ्यांना हक्काची मोफत पाच ब्रास वाळू मिळावी या मागणीसाठी यवतमाळच्या वणी येथे घरकुल लाभार्थी व सरपंचांनी वाळू सत्याग्रह केला. निर्गुडा नदीच्या कोरड्या पात्रात विजय पिदुरकर यांच्या नेतृत्वात मोठ्या संख्येने घरकुल लाभार्थी उतरले, तेथील वाळू उचलून सत्याग्रह केला. शासनाने आदेश देऊनही महसूल प्रशासन त्याला केराची टोपली दाखवीत असल्याने लाभार्थ्यांवर अन्याय होत आहे. वणी तालुक्यात १० हजारवर घरकुल लाभार्थी वाळू मिळत नसल्याने बेघर झाले आहे, मान्सून तोंडावर आहे, पाऊस आल्यास नदीतील वाळू मिळू शकणार नाही तेव्हा गरिबांनी कुठे आश्रय घ्यायचा असा प्रश्न लाभार्थ्यांनी उपस्थित केला. महसूल अधिकारी वाळू देत नसेल तर नदीतून स्वतः वाळू नेऊन सविनय कायदेभंग आंदोलन करू असा ईशारा यावेळी लाभार्थ्यांनी दिला.

---------------------------------------

अमरावती विद्यापीठ

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने नुकताच एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार विद्यापीठाच्या परीक्षांमध्ये स्तनदा माता विद्यार्थीनींना विशेष सुविधा मिळणार आहेत. विद्यापीठाने याबाबतची अधिसूचना जारी केली आहे. सदर अधिसूचनेनुसार, ज्या माता आपल्या बाळांना स्तनपान करतात, अशा विद्यार्थीनींना परीक्षे दरम्यान काही प्रमाणात अतिरिक्त वेळ आणि आवश्यक सुविधा पुरविल्या जाणार आहेत. नियमानुसार, परीक्षा सुरू झाल्यानंतर एक तासाने स्तनदा मातांना त्यांच्या बाळाला स्तनपान करण्यासाठी खोली सोडता येणार आहे. यासाठी त्यांना प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी वीस मिनिटांचा अतिरिक्त वेळ दिला जाईल.

---------------------------------------

हवामान

नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार उद्या आणि परवा नागपूर सह विदर्भातील बहुतांश जिल्हे जसे गोंदिया, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती, अकोला, वाशिम, या ठिकाणी वादळी पर्जन्यमानाचा इशारा यादरम्यान सोसाट्याचा वारा आणि मेघागर्जना यासह हलका पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, आज देखील पूर्व विदर्भात वादळी पर्जन्यमानाचा इशारा देण्यात आला होता. त्यानुसार नागपुरात सकाळपासून ढगाळ वातावरण आहे. आज विदर्भात सार्वधिक कमल तापमान नागपूर आणि अमरावती इथं ४१ अंश सेल्सियस इतका नोंदविण्यात आलं. आगामी काही तासात विदर्भातील चंद्रपूर जिल्ह्याच्या काही ठिकाणी विजेसह वादळी वाऱ्यासह हलक्या पावसाची शक्यता आहे. याशिवाय बुलढाणा, अकोला, वाशीम, अमरावती, वर्धा, गडचिरोली आणि यवतमाळ जिल्ह्यांच्या काही ठिकाणी देखील हलक्या पावसाची शक्यता आहे. अकोला जिल्ह्यात मूर्तिजापूर आणि अकोट तालुक्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पावसामुळं काही ठिकाणी फळबागांना फटका बसला आहे.

---------------------------------------